# डॉ.आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर

## अर्थशास्त्र,इतिहास, राज्यशास्त्र व पाली-प्राकृत विभाग

## विभागीय कृतिकार्यक्रम अहवाल

## २०१८-२०१९

### महापंडित राहुल सांकृत्यायन जन्मशताब्दी चर्चासत्र

डॉ आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथील अर्थशास्त्र, इतिहास,राज्यशास्त्र, पाली प्राकृत व डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिटट्यूट ऑफ सोशिओ इकॉनॉमिक्स स्टडीज, भारतीय दलित पँथर आणि कष्टकरी जनआंदोलन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित महापंडित राहुल सांकृत्यायन जन्मशताब्दी चर्चासत्र१५ /०७ /२०१८ ला सकाळी १० ते ४ना. ह. कुंभारे सभागृह डॉ आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी नागपूर येथे आयोजित केला होता.

या कार्यक्रमाला **प्रमुख मान्यवर सहभागी झाले होते.**

**आयु. पन्नालाल सुराणा (जेष्ठ विचारवंत)**

**डॉ. एम. एल. कासारे (जेष्ठ विचारवंत व अर्थशास्त्राचे अभ्यासक)**

**डॉ रूपाताई बोधी- कुलकर्णी ( सामाजिक कार्यकर्त्या )**

**प्रकाश  बनसोड ( अध्यक्ष भारतीय दलित पँथर)**

**विलास भोंगाडे(कष्टकरी जनआंदोलन)**

महापंडित राहुल सांकृत्यायन जन्म धार्मिक प्रवृत्तीच्या ब्राह्मण घराण्यात झाला. परंतु आर्य समाज वर्णव्यवस्था मानत असल्याने त्यांच्या बुद्धीला ते पटत नव्हते. बौद्ध धम्मात मूर्तीपूजा नाही, कर्मकांड नाही,बुद्ध स्वतःला मोक्षदाता नव्हे मार्गदाता असल्याचे म्हणतात. त्यामुळे ते बुद्ध विचाराकडे आकर्षित झाले. पुढे त्यांनी  बुद्ध तत्वज्ञानाचा अभ्यास करण्यासाठी अनेक देशात भ्रमण केले व त्या देशातील ग्रंथ आणले. या ग्रंथाचा अभ्यास व सारासार विचार करून त्यांनी बौद्ध धम्माचा स्वीकार केल्याचे प्रतिपादन जेष्ठ विचारवंत पन्नालाल सुराणा  यांनी केले. महापंडित राहुल सांकृत्यायन

यांच्या जन्मशताब्दी निमित्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर इन्स्टिट्यूट ऑफ सोशिओ इकॉनॉमिक्स स्टडीज, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास वपाली प्राकृत विभाग तसेच भारतीय दलित पँथर आणि कष्टकरी जनआंदोलन यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथे चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी 'राहुल सांकृत्यायन जीवन व कार्य ' या विषयावर वक्ता म्हणून ते बोलत होते. त्यांनीसांकृत्यायन यांच्या ' वोल्गा ते गंगा तक' या पुस्तकातील संदर्भाचा उल्लेख घेत मानवी विकास प्रक्रियेतील टप्प्यांचा आढावा घेतला आहे. लोखंड युग, ताम्र युग, आदीपासून मानवी विकास कसा होत गेला, याची मांडणी केली.

डॉ. एम . एल . कासारे जेष्ठ विचारवंत व अर्थशास्त्राचे अभ्यासक यांनी बुद्धांच्या आर्थिक तत्वांवर प्रकाश टाकला. बुद्धांचा शांती , करुणा, व मैत्रीचा विचार जगमान्य असला तरी त्यांच्या अर्थशास्त्र विषयक तत्व ज्ञानावर फारसा प्रकाश टाकला गेला नाही. जर्मन उद्योजग व अर्थतज्ञ शूमेकर यांच्या पुस्तकात बौद्ध अर्थशास्त्राचा प्रामुख्याने उल्लेख आहे. बुद्धाने जे सम्यक आजीविकेचे तत्व मांडले आहे, ते अनादी काळासाठी शाश्वत आहे. त्या तत्वज्ञानाचा
उपयोग करणारे जपान प्रगतीच्या शिखरावर असल्याचे ते म्हणाले.

प्रा. डॉ. गौतम कांबळे यांनी सांकृत्यायन यांच्या स्वातंत्र्य चळवळीतील कार्य कम्युनिस्ट म्हणून कामगार व श्रमिकांसाठी केलेल्या कार्याचा आढावा घेतला.

दुसऱ्या सत्रात राहुल सांकृत्यायन यांच्या स्त्रीमुक्ती संबंधातील विषयावर डॉ रूपाताई बोधी- कुलकर्णी यांनी विचार मांडले.यानंतर वेगवेगळ्या सत्रात अशोक थूल, प्रा. अजित झा, यांनी त्यांचे विचार मांडले. संचालन प्रा. डॉ. मोहन वानखडे यांनी केले. चर्चासत्राच्या आयोजनात भारतीय दलित पँथरचे प्रकाश बनसोड कष्टकरी जनआंदोलनाचे विलास भोंगाडे, बबन शृंगारे, गोपीचंद कातुरे प्रा. विद्या चौरपगार, प्रा. डॉ अविनाश फुलझेले, प्रा. डॉ शैलेश बहादुरे, प्रा. रोहीनी मेश्राम, अशोक दगडे, नाना कडवे, प्रसेनजीत ताकसांडे, अ‍ॅड. डॉ. रमेश शंभरकर, भीमराव वानखडे, शिवचरण थूल, सिद्धार्थ शंभरकर आदींचा सहभाग होता.



Scanned with CamScanner



Scanned with CamScanner